**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : दत्तात्रय किसन जढर,
वय : ४२ वर्षे,
पद : हवालदार, बक्कल नं.२२५२, पारगाव पोलीस स्टेशन,
राहणार : पारगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.

**सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके.**

१. घटनेवेळी मी पारगाव पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक म्हणुन कार्यरत होतो. घटना दि.०९/०९/२०२३ रोजी घडली. त्या दिवशी मी पोलीस स्टेशनला हजर असतांना ए.पी.आय. थाटे यांनी मला व पोलीस कॉन्स्टेबल साळवे, पोलीस कॉन्स्टेबल मदने यांना बोलावुन सांगितले की, मला गुप्त बातमी मिळाली आहे. मौजे लोणी, मैत्री बारच्या समोर सोनवणे चायनिजच्या बाजुला वडाच्या झाडाखाली जाऊन तुम्ही छापा टाका. त्या ठिकाणी परेश शहा हा इसम ओळखीच्या लोकांना चोरुन ताडी विक्री करीत आहे असे सांगितले. त्यावेळी मी माझ्या ओळखीचे दोन पंच नामे अंकुश ज्ञानेश्वर पोखरकर व काळुराम तुकाराम रोडे यांना बोलावुन घेतले. त्यांना सदर बातमीचा आशय समजावुन सांगुन छापा कारवाईकरीता हजर राहण्याची विनंती केली. त्यांनी संमती दर्शविल्यानंतर आम्ही पोलीस स्टाफ व पंच असे खाजगी वाहनाने छापा टाकण्याचे साहित्य घेऊन घटनास्थळी गेलो.

२. घटनास्थळी एक इसम पांढ-या पिशवीत काहीतरी घेऊन बसला होता. आम्ही जावुन त्याला पकडले असता त्याच्याजवळ पांढ-या पिशवीमध्ये एक किलोच्या एकुण ५० पिशव्यांमध्ये ताडी होती. एकुण ५० लिटर ताडी रक्कम रु.९८०/- रुपयाची होती. त्या इसमाचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव परेश प्रकाश शहा असल्याचे सांगितले. सदर मुद्देमालापैकी १८० मिली ताडीची बॉटल काढून घेतली. त्यावर माझ्या व पंचाच्या सहीचे लेबल चिटकविले. त्यावेळी आम्ही जप्ती व घटनास्थळ पंचनामा तयार केला.

३. आता मला दि.०९/०९/२०२३ रोजीचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात येते. सदर मुद्देमालाची मुद्देमाल पावती फाडली. आता मला दि.०९/०९/२०२३ रोजीची मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१६** देण्यात येते.

४. आरोपीविरुध्द पोलीस कॉन्स्टेबल मदने यांनी फिर्याद (निशाणी क्र.१०) दाखल केली. मुद्देमालातील काढुन ठेवलेली बॉटल रासायनिक पृथ्थकरणासाठी पाठवली. सदर पत्र आता मला दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१७** देण्यात येते. रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल प्राप्त झालेला आहे. आता मला सदर अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यास **निशाणी क्र.१८** देण्यात येते.

५. त्यानंतर मी साक्षीदारांचे तपासटिपण नोंदविले. तपासावरुन आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने मी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास : आरोपी पक्षातर्फे वकील श्री. एन. आर. निघोट यांच्यामार्फत</u>**

६. साहेबांना ज्या बातमीदारामार्फत माहिती मिळाली त्याचे नाव मला सांगता येणार नाही. वडगाव पीर हे गाव पोलीस स्टेशन पासुन १० किमी अंतरावर आहे तसेच धामणी हे गाव पोलीस स्टेशनपासुन १७ किमी अंतरावर आहे. पंचाना पंचनाम्याकरीता उपस्थित राहण्यासाठी लेखी नोटीस दिली नव्हती. मी पंचाना दोन वर्षापासुन ओळखतो. मी पंचाना या एकाच पंचनाम्यासाठी बोलविले. हे म्हणणे खरे आहे की, नियमानुसार पंचनाम्याकरीता त्रयस्थ इसम पंच म्हणुन बोलवायचे असतात.

प्रश्न - सरकारी कर्मचा-यांना पंचनाम्याकरीता बोलविण्याची मुभा असते ?

उत्तर - सरकारी कर्मचा-यांना पंचनाम्याकरीता बोलविण्याची मुभा असते परंतु गंभीर गुन्हयामध्ये असते.

७. आम्ही पंचनाम्याकरीता खाजगी वाहन स्वीफ्टने गेलो होतो. गाडीचा नं.एम.एच.१२ पी.टी.३२७२ असा होता. मला त्या गाडीच्या मालकाचे नाव माहिती नाही. छापाकारवाईला जाण्याकरीता तसेच खाजगी वाहन वापरल्याची नोंद स्टेशन डायरीला केली नाही. सरकारी कामासाठी सरकारी गाडी असते. सदर वाहनाचे भाडे दिले किंवा कसे हे मला माहिती नाही. मी मैत्री बार व सोनवणे चायनीज येथील लोकांचे जबाब घेतले नाही. सदर गुन्हयामध्ये मी ज्यांचा जबाब नोंदविला ते पोलीस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तपासकामी आजुबाजूच्या लोकांचे जबाब नोंदविणे महत्वाचे असते.

८. हे म्हणणे खरे आहे की, मुद्देमाल नष्ट करण्यासाठी न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते. मुद्देमाल नष्ट करण्यासाठी न्यायालयाकडुन परवानगी घेतली नव्हती. घटनास्थळाच्या पुर्व पश्चिम बाजुला बेल्हा - जेजुरी रोड आहे. उत्तरेला सोनवणे चायनीजचे दुकान आहे. दक्षिण बाजुस सोनवणे यांची जमीन आहे. मी कॅमेरा असलेला मोबाईल दहा वर्षापासुन वापरतो. सरकारी कामासाठी मी मोबाईल वापरत नाही. पारगाव येथे फोटोग्राफरचे स्टुडिओ आहे. छापा कारवाईकरीता आम्ही फोटोग्राफर सोबत नेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी जप्त मुद्देमाल न्यायालयासमोर नाही. जप्त मुद्देमालापैकी एक बाटली न्यायालयाकरीता व एक बाटली पोलीस स्टेशनकरीता काढून ठेवण्यास मला कोणतीही हरकत नव्हती. मला साहेबांनी दुपारी ३.०० वाजता बोलविले. पोलीस स्टेशनपासुन घटनास्थळ १० किमी अंतरावर आहे. तेथे जाण्याकरीता अर्धा तास लागतो. गावामध्ये एखादा व्यक्ती बेकायदेशीररीत्या दारुविक्री करीत असले तर त्याची तक्रार पोलीस स्टेशनला येते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दारुविक्री करीत आहे अशी तक्रार पोलीस स्टेशनला आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी आरोपी हा ताडी विकत नव्हता म्हणुनच आम्ही फोटोग्राफर नेला नाही, जप्त मुद्देमाल काढुन ठेवला नाही आणि त्यामुळे मी कोणत्याही त्रयस्त इसमाचे जाबजबाब नोंदविले नाही.

९. वर्षभरामध्ये आम्ही दारु विक्रीचे ३०- ४० गुन्हे दाखल करतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर ३०-४० गुन्हयांचा कोटा पुर्ण करण्यासाठी सदरचा गुन्हा दाखल केला आहे. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपीने कधीही ताडी विक्री केली नाही, मी चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि. १२/११/२०२५**
**घोडेगाव**